॥ आजिं सोनियाचा दिनु ॥

गायिकाः लता मंगेशकर
गीतः संत ज्ञानेश्वर
संगीतः पं. हृदयनाथ मंगेशकर

आजिं सोनियाचा दिनु
वर्षे अमृताचा घनु।
हरी पाहिला रे, हरी पाहिला रे ॥ धृ. ॥

सबाह्याभ्यन्तरी अवघा
व्यापक मुरारि।
हरी पाहिला रे, हरी पाहिला रे ॥ १ ॥

दृढ विटे मन मुळी
विराजित वनमाळी।
हरी पाहिला रे, हरी पाहिला रे ॥ २ ॥

बरवा संत समागमु
प्रगटला आत्मारामु।
हरी पाहिला रे, हरी पाहिला रे ॥ ३ ॥

कृपासिंधु करुणाकरु
बापरखुमादेवीवरू।
हरी पाहिला रे, हरी पाहिला रे ॥ ४ ॥

स्बाह्याभ्यन्तरीः बाहेरून व आतून
अवघाः पूर्ण
बरवाः चांगले